डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१८–१९/६०३ **अत्यंत महत्त्वाचे** दि. २०/०३/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे, अहमदनगर, नाशिक.

**विषय : कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि प्रबोधनासाठी रासेयो स्वंयसेवकांचा सहभाग**

महोदय,

केंद्र व राज्य शासन कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गंभीरपणे प्रयत्न करत आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेत मागील चार ते पाच वर्षांत 'आव्हान' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरामध्ये पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील ज्या रासेयो स्वंयसेवकांनी विशेष प्रशिक्षण घेतले आहे अशा सर्व स्वयंसेवकांनी कोरोना विषाणू आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नागरीक प्रबोधन विशेष अभियानात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा रासेयो विभाग विशेष आवाहन करत आहे.

'आव्हान व पूरग्रस्त आपत्ती व्यवस्थापन शिबिरात सहभागी रासेयो स्वंयसेवकांनी ह्याबाबत त्या त्या वर्षातील सहभागीचा "WhatsApp Group" तयार करावा. आणि त्या ग्रुपमध्ये (९८८१९०८०२०–डॉ. प्रभाकर देसाई) हा मोबाईल नंबर समाविष्ट करावा. ह्या प्रत्येक गटासाठी पुढील काळात नागरिक प्रबोधन विशेष अभियानाची माहिती व रूपरेषा कळवली जाईल. हे निवेदन अत्यंत तातडीचे आणि राष्ट्रीय आपत्तीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे आहे. सदर परिपत्रक 'आव्हान' शिबिरार्थीच्या आणि इतरही इच्छूक रासेयो स्वंयसेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

# “WhatsApp Group” मधील रासेयो स्वंयसेवकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. आव्हान शिबिरार्थींनी त्या त्या वर्षीच्या सहभागींचा जिल्हानिहाय “WhatsApp Group” तयार करावा.

२. पूर आपत्ती व्यवस्थापन शिबिरार्थींनी जिल्हानिहाय “WhatsApp Group” ग्रुप तयार करावा.

३. ह्या ग्रुपवर कोरोना व्यतिरिक्त कोणत्याही मजकुराचे आदान—प्रदान करू नये.

४. कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे जर आपातकालीन परिस्थिती निर्माण झाली तर ह्या ग्रुपमधील सर्व रासेयो स्वंसेवकांना राज्य व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार नजीकच्या काळात निश्चित केलेली जबाबदारी सोपवली जाईल.

५. तूर्तास सर्व स्वंयसेवकांनी व्यक्तिगत पातळीवर आपापल्या परिसरात आणि सोसायट्यांमध्ये/गावांमध्ये कोरोना विषाणूबाबत शास्त्रीय प्रबोधन करावे.

६. कोरोनाग्रस्त व्यक्तींना सामाजिक पातळीवर बहिष्कृत न करता त्यांचे वैद्यकीय मानकानुसार विलगीकरण करण्याच्या प्रक्रियेत आपण व्यक्तिगत पातळीवर आपल्या संपर्कातील सर्व नागरिकांमध्ये प्रबोधन करावे.

७. दि. २२ मार्च २०२० रोजी, सकाळी ७ ते रात्री ९ या काळात ‘जनता संचार बंदी’ घोषीत करण्यात आली आहे. या संदर्भातील जागृती आपापल्या परिसरात एकेकट्याने करावी आणि हे अभियान यशस्वी करावे.

८. ह्या सर्व “WhatsApp Group” मधील रासेयो स्वंयसेवकांनी विद्यापीठाच्या कोणत्याही निर्देशाशिवाय आपल्या स्तरावर धोरणात्मक निर्णय अथवा कार्यवाही करू नये.

९. “WhatsApp Group” वर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रासेयो विभाग सतत संपर्कात राहील.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्रालय
भारत सरकार

Help us to help you

# नोवल कोरोनावायरस (COVID-19)



## खुद रहें सुरक्षित, दूसरों को रखें सुरक्षित

## क्या करें और क्या ना करें

### क्या करें ✓

- बार-बार हाथ धोएं। जब आपके हाथ स्पष्ट रूप से गंदे न हों, तब भी अपने हाथों को अल्कोहल - आधारित हैंड वॉश या साबुन और पानी से साफ करें
- छींकते और खांसते समय, अपना मुंह व नाक टिशू/रुमाल से ढकें
- प्रयोग के तुरंत बाद टिशू को किसी बंद डिब्बे में फेंक दें
- अगर आपको बुखार, खांसी और सांस लेने में कठिनाई है तो डॉक्टर से संपर्क करें। डॉक्टर से मिलने के दौरान अपने मुंह और नाक को ढंकने के लिए मास्क/कपड़े का प्रयोग करें
- अगर आप में कोरोना वायरस के लक्षण हैं, तो कृपया राज्य हेल्पलाइन नंबर या स्वास्थ्य मंत्रालय की 24X7 हेल्पलाइन नंबर 011-23978046 पर कॉल करें
- भीड़-भाड़ वाली जगहों पर जाने से बचें

### क्या न करें ⊗

- यदि आपको खांसी और बुखार का अनुभव हो रहा हो, तो किसी के साथ संपर्क में ना आयें
- अपनी आंख, नाक या मुंह को ना छूयें
- सार्वजनिक स्थानों पर ना थूकें

## हम सब साथ मिलकर कोरोनावायरस से लड़ सकते हैं

अधिक जानकारी के लिए
स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्रालय भारत सरकार के 24X7 हेल्पलाइन नं. +91-11-2397 8046 पर कॉल करें या

7102/13/0021/1920